बीड । बुधवार
८.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 

# विकासाच्या 'केंद्र'स्थानी खासदारांची 'दिशा'




## झेडपी नगरपरिषदा धारेवर,पाणी,स्वच्छता, कृषी विमा,आरोग्यावर विभागांचा आढावा

## बजरंग बाप्पांच्या सदरेवर कलेक्टर, सीईओ,सीएस,डीएचओ

- केंद्र सरकारच्या योजनाचे ध्येय उदिष्टय वेळेत पूर्ण करा
- ग्रामीण पाणी पुरवठा योजना घेतल्या फैलावर
- स्वच्छ भारत मिशन गतिमान करणार
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनाचे प्रकल्प गतिमान करा
- ग्रामीण भागातील आरोग्य अधिकारी निवासी राहतील
- आधार केंद्रावर लोकांना अडचण येऊ देऊ नका

बीड, (प्रतिनिधी):-जिल्ह्यात विकास कामांना गती देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे सरसावले असून मंगळवार दि.७ जानेवारी रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा विकास समन्वय व संनियत्रण समितीची बैठक घेण्यात आली. खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीला जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने आणि सर्व विभागांच्या खातेप्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी खा.सोनवणे यांनी आपण सर्व मिळून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करू, असे म्हणत अधिकाऱ्यांना विश्वासात घेतलेच शिवाय, अनेक मुद्द्यावर त्यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी देखील केली. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दिशा समिती अंतर्गत विषयाचा/ योजनांचा सन २०२४-२५ या वर्षाचा डिसेंबर अखेरचा आढावा खा.बजरंग सोनवणे यांनी घेतली. ११ वाजता या बैठकीला सुरूवात झाली होती. सदरील बैठक ४ वाजेपर्यंत सुरू होती. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना-शहरी, स्वच्छ भारत मिशन, स्मार्ट सिटी अभियान, अटल मिशन फॉर रिजरवेशन अँड अर्बन ट्रांसफॉर्मेशन, रेल्वे, महामार्ग, डिजीटल भारत भुमी-अभिलेख आधुनिकरण कार्यक्रम, एमएसईबी, टेलीकॉम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, मध्यान्न भोजन योजना, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बालविकास सेवा योजना, राष्ट्रीय आरोग्य मिशन, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, डीजीटल इंडिया पब्लीक इंटरनेट एक्सेस प्रोग्राम ग्रामपंचायतमध्ये सामान्य सेवा केंद्र उभारणे, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोत्ती अभियान, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आदिंचा आढावा घेण्यात आला. यावेळी रोजगार हमी योजनेतील कामे ▶▶पान २ वर

## नीता अंधारेंचा खोटारडेपणा

### कलेक्टरांनी टोचले कान



बीड नगर परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निता अंधारे यांनी सभागृहाला माहिती देताना खोटी माहिती दिल्याचे स्वतः जिल्हाधिकारी म्हटले आणि यांना नोटीस बजवा असे म्हटले. नगर परिषदेची वसुली ९० टक्के असल्याचे नीता अंधारे यांनी म्हणताच जिल्हाधिकारी पाठक यांनी टोकताना खोटे बोलू नका, तिकडे आयुक्ताकडे २५ टक्के म्हणता इकडे २५ असे म्हटले. सभागृहास खोटी माहिती दिले बाबद नोटीस बजावण्याचे फर्मान देखील सोडले. यावेळी आपली बदली व्हावी अशी इच्छा व्यक्त करताना अंधारे यांच्याकडून विषयांतर झाले.



## डॉ.अशोक थोरातांचे कौतुक

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी पदभार घेतल्या नंतर रुग्णांना बाहेर पाठवणे कमी झाले असून सरकारी दवाखान्यात प्रभावी व तत्पर सेवा मिळत असलेबाबद अध्यक्ष खा. सोनवणे व समितीकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

## दोनशे दोन मधील बोगस वसतीगृह किती?

बीड मध्ये ऊसतोड कामगारांच्या पाल्यासाठी तब्बल २०२ तर पैकी धारूर मध्येच ७८ वसती गृह असल्याचे समोर आले. केवळ कागदावर असलेल्या वसतीगृह व वास्तवीक पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना खा. बजरंग सोनवणे यांनी अध्यक्ष म्हणून केल्या अन् सीईओंची बोलती बंद. बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे, याठिकाणचे लोक रक्ताचे पाणी करून लेकरांना शाळा ▶▶पान २ वर

## खासदार बोलले,कलेक्टरांनी अग्रीम हो म्हटले

खासदारांनी बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा संदर्भात २३/२४ मधील अग्रीम कधी देणार आहात आणि सटेल क्लेम कधी देणार असे विचारले जिल्हाधिकारी पाठक यांनी तात्काळ यावर तात्काळ कार्यवाही करू असे आश्वासन दिले.

# बीड ते पिंपळनेर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी



पिंपळनेर, (प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील उमरी ते पिंपळनेर १५ ते २० किलोमीटर रस्त्याचे काम मागील चार दिवसांत सुरू आहे. रस्त्यावरीलवरील धूळ स्वच्छ न करता अथवा रस्त्याची लेव्हल न करता हा रस्ता डांबरीकरण करण्याचे काम संबंधित ठेकेदाराने सुरू केले आहे. लोकप्रतिनिधी येथील ठेकेदारांची पाठराखण करत असल्याचा आरोपदेखील ग्रामस्थ करत आहेत. बीड तालुक्यातील उमारी ते पिंपळनेर या पंधरा ते वीस किलोमीटर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत आहे. याबाबत अनेकवेळा तक्रारी करूनदेखील संबंधित विभाग व जिल्हा प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. रस्त्यावर केवळ खडी व डांबर अंथरून थातूरमातूर रस्ता करण्याचे काम सुरू आहे. अक्षरशः हा रस्ता हातानेही उकरला जात असल्याची स्थिती आहे. यामुळे लगेचच या रस्त्यावर पुन्हा खड्डे तयार होतील. या रस्त्याचे काम तत्काळ थांबवून झालेल्या निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची चौकशी करा, तसेच जो ठेकेदार या रस्त्याचे काम करत आहे, त्याला काळ्या यादीत टाका, अशी मागणीदेखील तेथील ग्रामस्थ करत आहेत.ङ्ग रस्ता पूर्णतः धुळीने माखलेला आहे. रस्त्यावरीलवरील धूळ स्वच्छ न करता ▶▶पान २ वर

# अविनाश पाठक यांनी दिली वीस बिअरबारला मंजूरी

## जिल्ह्यात ८४० बिअर बार ; दारूडे अजून किती वाढवायचे?-ॲड.अजित देशमुख



बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्ह्यात एकीकडे गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असताना दुसरीकडे दारूची दुकाने वाढवून समाजाची वाट लावली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन वीस बिअरबारला मंजुरी दिल्याने आता जिल्यातील दारू दुकानांची संख्या आठशे चाळीस वर गेली आहे. आता तरी दारुड्यांची संख्या वाढवू नका. नवीन दारू दुकाने देऊ नका, अशी मागणी जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात बिअरबार, देशी दारू, ▶▶पान २ वर

- जिल्ह्यात आठशे चाळीस दारू दुकाने
- दिपा मुंडे यांनी छपन्न बियरबार दिले
- पाठक यांनी वीस बार तडकाफडकी दिले
- गुंडगिरी,दारुड्यांना प्रशासनाचे प्रोत्साहन
- समाजहित पहा,नैतिकता बाळगा
- बाहेरच्या लोकांनी मलिदा मारल्याची चर्चा

### अरोपींच्या अटकेसाठी पवार कुटुंबाचे

## बिंदुसरा नदीपात्रात जलसमाधी आंदोलन



बीड, (प्रतिनिधी) :- पेठ बीड हद्दीत गळफास घेतलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला पण आरोपी अटक नसल्याने नातेवाईकांनी आक्रमक पावित्रा घेत आज आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी बिंदुसरा नदीपात्रात जलसमाधी आंदोलन केले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. शहरातील नाळवंडी रस्त्यावर सारडा जिनिंग परिसरात रहातं असलेल्या दोन्ही बाजुतीच्या पवार कुटुंबाचे वाद आहेत. यातून दि. २ जानेवारी रोजी आरोपींनी ▶▶पान २ वर

# आ.संदीप क्षीरसागर,माजी आ.सय्यद सलीम यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## बीडच्या बायपासवर दोन्ही ठिकाणच्या उड्डाणपूल आणि सर्व्हिस रोडची निवीदा प्रसिद्ध




बीड, (प्रतिनिधी):- आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या निरंतर प्रयत्न आणि पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. मा.उच्च न्यायालयाच्यख निर्देशानुसार बीड शहराच्या बाजूने जाणार्या बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि इतर ठिकाणच्या स्लीप सर्व्हिस रोडच्या कामासाठी आता निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. २२ जानेवारीपर्यंत निवीदा मागविल्या असून लवकरच काम सुरू केले जाणार आहे. बीड बायपासवर बीड शहरात ये-जा करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज चौक समनापूर व महालक्ष्मी चौक, जिरेवाडी ही दोन ठिकाणे प्रवेशद्वार होती. परंतु याठिकाणी उड्डाणपूल नसल्यामुळे याठिकाणांवर अपघातांची मालिका सुरू होती. यासोबतच इमामपूर, नाथापूर व परळी रोडला स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळेही या भागातील नागरिक आणि या परिसरात शेती असलेले शेतकरी यांना त्यांच्या शेतात जदिवसेंदिवस होत असलेले अपघात आणि जाणारे जीव यांची दखल आता मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने घेतली असून यासंदर्भातील आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने निर्णय दिला असून, डिसेंबर २०२४ पर्यंत १२ कि.मी. अंतर असलेल्या बीड शहराच्या लगत असलेल्या बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे ▶▶पान २ वर

# चमकोगिरी थांबवा अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल



## बाबुराव पोटभरेंचा आ.सुरेश धस,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांना ईशारा

बीड, (प्रतिनिधी):- जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राहिला पाहिजे, संतोष देशमुख हत्येतील आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, देशमुख कुटुंबांचे पुनर्वसन झाले पाहिजे, संतोष देशमुख यांच्या पत्नी यांना सरकारी नोकरीत घेतले पाहिजे, मुलांची शैक्षणिक जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे यासह इतर प्रमुख प्रश्न उपस्थित करत बाबुराव पोटभरे यांनी आ. सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रकाश सोळंके यांच्यावर निशाणा साधला. सर्वांनी आता चमकोगिरी बंद करावी अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा आज घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बाबुराव पोटभरे यांनी दिला. संतोष देशमुख यांची झालेली हत्या महाराष्ट्राला आणि मानवतेला काळीमा फासणारी आहे. त्यांच्या मारेकऱ्यांना फाशीच झाली पाहिजे. पण त्यांच्या हत्या प्रकरणाआडून काही तथाकथित पुढारी चमकोगिरी करित आहेत. या प्रकरणाचा इव्हेंट करु नका, मजाक उडवू नका, चमकोगिरी थांबवा नाहीतर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे ▶▶पान २ वर

# खतांच्या किंमती वाढल्या, शेतीचे बजेट कोलमडलं!

मुंबई, (वृत्तसेवा):-वातावरणात होणारे बदल तसेच दिवसेंदिवस वाढती महागाई पाहता शेती करणे अवघड झाले आहे. अशातच आता रासायनिक खतांच्या किमतीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कच्च्या मालाच्या किमती वाढल्यामुळे खतांच्या दरात वाढ झाली आहे. संयुक्त खतांच्या ५० किलोच्या पिशवीमागे २४० ते २५५ रुपयांच्या किंमती वाढण्यात आल्या आहेत. १ जानेवारीपासून कंपन्यांनी खतांच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. प्रामुख्याने डीएपी आणि संयुक्त खते तयार करण्यासाठी लागणारे फॉसफेट रॉक, अमोनिया, फॉस्फेरीक ॲसिड, नायट्रोजन, झिंक, सल्फर या घटकांची गरज मोठ्या प्रमाणात भासते. या सर्व ▶▶पान २ वर



# मारक पालक नकोत!



महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला झाली. मतमोजणी २३ नोव्हेंबरला झाल्यानंतर ५ डिसेंबरला भव्य सोहळ्यात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मंत्रिमंडळ विस्तारात आणखी पंधरवडा गेला आणि त्यानंतर आठवडाभराने २१ डिसेंबरास शपथ घेतलेल्या मंत्र्यांस आपण कोणत्या खात्याची जबाबदारी हाताळणार ते कळले. या खातेवाटपासही आता दोन आठवडे उलटून गेले. तरीही फडणवीस, शिंदे वगळता सरकार कामाला लागले आहे असे चित्र अजूनही दुरापास्तच. तीन-तीन पक्षांची सत्ताधारी आघाडी, इतके दणकट बहुमत आणि तरीही सरकार बाळसे धरताना दिसत नाही, असे का? याचे कारण या मंत्रिमंडळातील अनेकांचा डोळा पालकमंत्रीपदावर असणे. अलीकडे अनेकांचे नुसते मंत्रीपदावर भागत नाही. अधिकस्य अधिकम फलम या तत्त्वानुसार अनेकांस 'रसदार' खात्याइतकाच रस असतो तो कोणत्या तरी जिल्ह्याचे पालकमंत्री होण्यात. काही महाभाग तर असेही म्हणतात की एक वेळ बिनखात्याचे मंत्री केले तरी चालेल; पण एखाद्या जिल्ह्याचे तरी पालकमंत्री करा. म्हणजे साध्या वा महत्त्वाच्या खात्यापेक्षाही या सर्वांचा जीव अडकलेला आहे तो पालकमंत्रीपदात. हे पालकमंत्रीपद वाटप अद्यापही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेले नाही. तसे ते करण्याआधी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री हे पद आपल्याकडेच राहील अशी घोषणा करण्यास मात्र ते विसरले नाहीत. गडचिरोली जिल्हा हा खाणींचा आणि जंगल संपत्तीचा. या खाणींत अनेकांचे हितसंबंध दडलेले आहेत. म्हणून मंत्रिमंडळातील काही वजनदार मंडळींचा या जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावर डोळा होता. फडणवीस यांनी त्यांचे या जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचे मनसुबे हाणून पाडले हे उत्तम झाले. फडणवीस यांनी पुढे जाऊन आणखी एक करावे. पालकमंत्री ही प्रथाच बरखास्त करावी. एरवीही महाराष्ट्राचे सर्व जिल्हे पालकमंत्र्यांविना इतका काळ सहज चालू शकले. या काळात पालकमंत्री नाहीत म्हणून कोणत्याही जिल्ह्याचा श्वास अडकला असे झालेले नाही. उलट ही पालकमंत्रीपदाची ब्याद नसल्याने जिल्हा प्रशासनाची डोकेदुखी अद्याप सुरू झालेली नाही. तेव्हा पालकमंत्री असण्यापेक्षा ते नसणे हे विकास आणि प्रशासन यांच्यासाठी अधिक सोयीचे असेल तर ही पालकमंत्रीपदे हवीत कशाला? असे पालकमंत्री असणे ही राज्याची गरज नाही. आपल्या जिल्ह्यास पालकमंत्री नाही म्हणून कोणा जिल्ह्यातील नागरिक आक्रोश करीत आहेत असे चित्र नाही. अधिकारी वर्गाचे पालकमंत्र्यांविना काही अडते असे नाही. आणि तरीही पालकमंत्रीपदासाठी इतकी साठमारी होत असेल तर हे असे पालकमंत्रीपद मिळणे/मिळवणे ही अन्य कोणाहीपेक्षा केवळ सत्ताधारी राजकारण्यांची गरज ठरते. या मूठभरांची गरज भागवण्याची जबाबदारी आणि खर्च राज्याने सहन करण्याचे कारणच काय? मुळात पालकमंत्री या पदास कोणताही वैधानिक आधार नाही. हे पद उपमुख्यमंत्रीपदासारखे आहे. उपमुख्यमंत्रीपदास कोणताही अधिकृत दर्जा नसतो आणि ना कोणते वेगळे अधिकार त्या पदास असतात. तरीही राजकीय अहं शमनार्थ ही पदे 'दिली' जातात. ती घेणाऱ्यासही या पदाचे वास्तव ठाऊक असते. तरीही ती मागितली जातात आणि त्या मागण्या पूर्ण केल्या जातात. का? कारण राजकीय गरज. त्याचप्रमाणे पालकमंत्रीपदाचेही आहे. या पदास कोणतेही घटनात्मक पाठबळ नाही की कसलाही वैधानिक दर्जा नाही. सत्ताधाऱ्यांच्या अहं शमनार्थ ही पदे अस्तित्वात आली आणि अनेक वाईट चालीरीतींप्रमाणे राजकीय रिवाज बनून गेली. या पदाचे मूळ आहे १९७२ साली तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी 'जिल्हा प्रभारी मंत्री' नेमण्याच्या निर्णयात. त्यावेळची राजकीय अपरिहार्यता म्हणून नाईक यांनी हा निर्णय घेतला असावा. तरीही तो घेताना नाईक यांनी एक शहाणपण दाखवले. ते म्हणजे जिल्ह्याचे प्रभारीपण त्या जिल्ह्याबाहेरील नेत्याहाती देणे. कारण त्याच जिल्ह्यातील व्यक्तीकडे जिल्ह्याची सूत्रे दिल्यास स्थानिक राजकारणावर त्याचा वाईट परिणाम होऊ शकतो आणि हे प्रभारी राजकीयदृष्ट्या इतरांपेक्षा अधिक सामर्थ्यवान होऊ शकतात. तसेच जिल्ह्यातील स्वत:च्या मतदारसंघाकडे विकास निधी त्यांच्याकडून वळवला जाण्याचा धोका असतो; तो वेगळाच. या धोक्याची जाणीव नाईक यांस मधुकरराव चौधरी आणि प्रतिभा पाटील यांच्यातील सुप्त संघर्षाने करून दिली असावी. या दोघांसही जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हवे होते. ही बाब लक्षात आल्यावर वसंतराव नाईकांनी जिल्ह्याबाहेरील व्यक्तीहाती प्रभारीपद सोपवले. पण वाईट गोष्टींचे अनुकरण करताना त्यातील त्यातल्या त्यात बऱ्या बाबी मागे सोडल्या जातात तसे या मुद्द्याचे झाले. आता तर त्याच जिल्ह्यातील व्यक्तींना त्या त्या जिल्ह्याचे पालकमंत्री केले जाण्याचा वाईट पायंडा पडताना दिसतो. तेव्हा या पालकमंत्रीपदावर इतका डोळा का? याचे उत्तर आपल्या अर्थनियोजनात आहे. राज्यस्तरीय अर्थसंकल्पात जिल्ह्याजिल्ह्यांस स्थानिक विकासासाठी निधी मुक्रर केला जातो. स्थानिक पातळीवरील नियोजन समित्यांमार्फत या निधीचा वापर होणे खरे तर घटनेनुसार आवश्यक आहे. पण अनेक ठिकाणी अशा नियोजन समित्याच नसतात आणि परिणामी जिल्हा 'विकासाची' सूत्रे पालकमंत्र्याहाती जातात. कारण पालकमंत्री हा जिल्हा नियोजन समित्यांचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. जिल्हा नियोजन समित्याच नाहीत आणि पालकमंत्री मात्र आहेत, असा प्रकार. तो सर्वांच्याच सोयीचा असल्याने कोण कोणाविरोधात काय बोलणार हा प्रश्नच. परत जनतेस याचे काही सोयरसुतक नसते. त्यामुळे जिल्ह्यासाठी अर्थसंकल्पात विनियोजित केलेल्या सर्व निधीचे नियंत्रण या पालकमंत्री नामक व्यक्तीहाती येते. वाल्मीक कराडसारखी विषवल्ली जिल्ह्याजिल्ह्यात वाढते, पोसली जाते, फोफावते ती या पालकमंत्री नामे व्यक्तीच्या हाती असलेल्या निधीवर. उद्देश भले जिल्ह्याच्या विकासाचा असेल! पण प्रत्यक्षात आपापल्या पित्त्यांची पोटापाण्याची व्यवस्था करणे, मर्जीतल्या कंत्राटदारांना मर्जीतील कामे देणे आणि सर्व निधी वाटून वाटून खाणे हेच होते. बीडमधील एका प्रकारावरून हे सारे उघडकीस आले. ते येण्याआधीही या पालकमंत्रीपदावरून या राज्यातील मतभेदांवर नजर टाकल्यास बीडमध्ये झाले ते का याचे उत्तर मिळेल आणि इतके सारे पालकमंत्री असूनही अनेक जिल्हे विकासाच्या मुद्द्यावर अनाथ का, हा प्रश्नही पडेल. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून दोन विकासपुरुष- भरत गोगावले आणि सुनील तटकरे- यांच्यात रस्सीखेच होणे, पुण्यावरून भाजपचे विकासोत्सुकपुरुष चंद्रकांतदादा पाटील आणि राष्ट्रवादीचे विकासवादी अजितदादा पवार यांच्यात स्पर्धा, नंदुरबार या अतिमागास जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदासाठी विजयकुमार गावित आणि माणिकराव गावित या दोघांत वाद होणे इत्यादी अनेक दाखले देता येतील. या सर्वांवरून एकच बाब स्पष्ट होते. ती म्हणजे नागरिकांच्या व्यापक उपयुक्ततेपेक्षा राजकीय उपद्रव शमनार्थ निर्माण झालेली पालकमंत्री ही व्यवस्था. खऱ्या विकासासाठी ओळखल्या जाणाऱ्या दक्षिणी राज्यांत ती नाही आणि बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आदी राज्यांत मात्र ती आहे ही बाब अत्यंत सूचक. अशा वेळी महाराष्ट्रास दक्षिणी राज्यांच्या विकासपंगतीत बसवण्याची ईर्ष्या दाखवणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री हे पदच बरखास्त करण्याची हिंमत दाखवावी. हे असे करणे किती आव्हानात्मक आहे, याची जाणीव आहे. तेव्हा ही पदे बरखास्त करता आली नाहीत तरी निदान जिल्ह्याबाहेरील व्यक्तीहाती जिल्ह्याची सूत्रे दिली जातील याची खबरदारी त्यांनी घ्यावी. खऱ्या विकासास मारक ठरत असलेल्या या पालकांना फडणवीस दूर करू शकले तर समस्त राज्य त्यांस दुवा देईल.

# बीडच्या आरोपींचा 'तेरे नाम'मधील सलमान झाला पाहिजे

## त्यांच्यावर मोक्का लावा, एकटे पडू द्या; सुरेश धसांचा सरपंच परिषदेतून हल्लाबोल

मुंबई, (वृत्तसेवा):-संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सरपंच परिषद आक्रमक झाली आहे. राज्यातील सरपंच मुंबईतील आझाद मैदान येथे एक दिवसीय धरणे आंदोलन करत आहेत. या आंदोलनात भाजप आमदार सुरेश धस यांनीही सहभाग घेतला. यावेळी बोलताना त्यांनी बीड प्रकरणातील आरोपींवर मोक्का लावण्याची मागणी केली. शिवाय त्यांची अवस्था तेरे नाम सारखी झाली पाहिजे, असेही ते म्हणाले. सरपंच परिषदेच्या वतीने संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ मुंबइतील आझाद मैदान येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येत आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी मोक्काअंतर्गत कारवाई करावी. मारेकऱ्यांना आश्रय देणाऱ्यांवर कारवाई व्हावी. देशमुख यांच्या पत्नीला शासकीय नोकरी आणि ५० लाखांची मदत करण्यात यावी. ग्रामपंचायत कामात अडथळा आणल्यास सरपंच उपसरपंच यांना ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची परवानगी द्यावी आणि मंत्री



धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, अशा मागण्या सरपंच परिषदेकडून करण्यात आल्या आहेत. यावेळी सुरेश धस यांनीही या आंदोलनात सहभाग घेतला. गावातील एक दलित वॉचमनला मारहाण होताना तो रोखायला गेला, २ कोटींची खंडणी मागणाऱ्यांना विरोध केला, एवढाच त्याचा गुन्हा ठरला. म्हणून त्याची निर्घृण हत्या केल्याचा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला. त्याला मारहाण करताना व्हिडिओ शुट करण्यात आला. दुसऱ्याला व्हिडिओ कॉल करून हा प्रकार दाखवला. संतोषने विनवण्या केल्यानंतरही त्याला सोडले नाही. या आरोपींना सांभाळणारे त्यांचे आका १०० टक्के ३०२ येणार, असा विश्वास सुरेश धस यांनी व्यक्त केला. या प्रकरणात उज्ज्वल निकम यांना केस कशी मिळेल, यासाठी मी प्रयत्न करतोय. आरोपींना बिनभाड्याच्या खोलीत ठेवले पाहिजे. नातेवाईक, मित्र कुणालाही त्यांना भेटता आले नाही पाहिजे. अशा ठिकाणी या आरोपींना ठेवा, अशी मागणी सुरेश धस यांनी केली. तसेच आरोपींची अवस्था ही तेरे नाम चित्रपटातील सलमान खान सारखी झाली पाहिजे. हे आरोपी पागलसारखे हिंडले पाहिजेत, अशी अवस्था त्यांची करायची आहे, असा आसूड सुरेश धस यांनी व्यक्त केला. गावासाठी चांगले काम करणाऱ्या संतोष देशमुखची हत्या झाली.

# धनंजय मुंडेंच्या अडचणीत वाढ
# करूणा मुंडेंची हायकोर्टात धाव

औरंगाबाद, (वृत्तसेवा):-बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. सर्वपक्षीय नेत्यांनी सोमवारी राज्यपालांची भेट घेत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यាप्रकरणात अडचणीत असलेल्या धनंजय मुंडे यांचे पाय आता आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे. आता धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध करुणा मुंडे यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. करुणा मुंडे यांच्यातर्फे ॲड. चंद्रकांत ठोंबरे हे काम पाहत आहेत. करुणा मुंडे यांनी मुंबई हायकोर्टाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत धनंजय मुंडे यांनी भ्रष्ट मार्गाने निवडणूक जिंकल्याचा आणि इतर आरोप केले आहेत. या निवडणूक याचिकेचा स्टॅम्प नंबर ५०९/२०२५ असल्याचे ॲड. चंद्रकांत ठोंबरे यांनी पत्रकात म्हटले आहे. याचिकेत म्हटल्यानुसार, करुणा मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघातून आमदारकीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज ३० ऑक्टोबर २०२४ रोजी फेटाळला होता. मात्र, धनंजय मुंडे आणि इतरांचे अर्ज मंजूर केले होते. परळी विधानसभा मतदारसंघातून धनंजय मुंडे निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी घोषित केले होते. त्यानंतर करुणा मुंडे यांनी ४ जानेवारी २०२५ रोजी



खंडपीठात निवडणूक याचिका सादर केली आहे. य याचिकेत करुणा मुंडे यांनी असे म्हटले आहे की, आप १९९६ साली कायदेशीर लग्न झालेली पत्नी असता धनंजय मुंडे यांनी दोन अपत्यांचा उल्लेख केला. मात्र पहिल्या पत्नीच्या नावावरील मालमत्ता आणि कोर्टाती प्रलंबित प्रकरणांची माहिती लपवली. मतदान प्रक्रिय सुरू असताना मतदान केंद्र ताब्यात घेतले. तसंच, बऱ्या मतदान केंद्रांवर सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही लावू दि नाहीत. राष्ट्रवादीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यां मतदान केंद्रावर प्रवेश करू दिला नाही. त्यांना मारहा करून धमक्या दिल्या. तसेच ॲड. माधवराव जाध यांना मारहाण केली. भ्रष्ट मार्गाने निवडणूक जिंकली असे अनेक आरोप करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्या केले आहेत.

## पान १ वरून

### विकासाच्या केंद्रस्थानी...

आणि जलजीवन मिशनची कामे पुर्ण का होत नाहीत, या कारणावरून खा.सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावेळी प्रत्येक अधिकाऱ्यांनी मंजूर असलेली पाच कामे निवडूण अचाणक भेटी देवून कामांची पाहणी करावी आणि होणारा भ्रष्टाचार थांबवावा, अशा सुचनाही यावेळी त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या. ०० प्रतिनियक्त्यावर खा.सोनवणेंचे बोट जिल्हा परिषदेत प्रतिनियुक्तीवर काम करण्याचा सपाटा लावलेला आहे. अनेक ठिकाणी नियम डावलून पदभार दिलेले आहेत. जे अधिकारी पुढाऱ्यांचे कार्यकर्ते असल्यासारखे वागतात त्यांनाच हे पद दिले असून येत्या आठ दिवसात वर्षानुवर्षे पदावर बसलेले हे लोक बाजुला करा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांना केल्या. यावेळी त्यांनी अनेक अधिकाऱ्यांचे उदाहरण दिले आणि तेच अधिकारीही समोर असल्याने यातली वस्तूस्थिती समोर आली. ०० गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीस जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठक दि.७ रोजी होणार असल्याने सर्व विभाग प्रमुखांना दोन दिवसांपुर्वीच कळविले होते. परंतु असे असतानाही जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, महावितरणचे अधिकारी आणि बीएसएनएलचे अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. या अधिकाऱ्यांना तातडीने नोटीस पाठविल्या जातील, असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी खा.बजरंग सोनवणे यांना शब्द दिला.

### दोनशे दोन मधील...

शिकवित आहेत. त्यांच्यासाठी जिल्हा परिषद हंगामी वसतिगृह चालविते. या वसतिगृहात दर्जेदार आहार दिला जातो का? असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी केला. इतकेच नाही तर सीईओ यांनी या लेकरांच्या वसतिगृहांना किती वेळा भेट दिली, असा थेट मुद्द्याला हात घातल्यानंतर सीईओ आदित्य जीवने यांची बोलती बंद झाली. शिवाय भेट दिली असेल तर फोटो दाखवा, असेही खासदारांनी म्हटल्याने सीइओंची चांगलीच तारांबळ उडाली.

### बीड ते पिंपळनेर...

अथवा रस्त्याची लेव्हल न करता हा रस्ता डांबरीकरण करण्याचे काम संबंधित ठेकेदाराने सुरू केले आहे. होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या रस्त्याची तक्रार करायची तरी कोणाकडे, असा सवाल येथील ग्रामस्थांनी नाव न सांगण्याच्या अटीवर उपस्थित केला.

### अविनाश पाठक यांनी...

वाईन शॉप, होलसेल अशी एकूण आठशे एकोन चाळीस एवढी दारू दुकानांची संख्या आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे या असताना त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात दारू दुकाने दुकानांना परवाना देण्यात आले.ङ्गदि. १ जानेवारी २०२३ पासून दि. १५ जून २०२४ या साधारणतः दीड वर्षाच्या काळामध्ये शहात्तर नवीन लायसन देण्यात आले. या दिड वर्षात देण्यात आलेल्या शहात्तर लायसन पैकी फक्त वीस लायसन अविनाश पाठक यांनी दिली. बाकीची लायसन तत्पूर्वीच्या जिल्हाधिकारी मुंडे यांनी दिले आहेत. एकीकडे गुन्हेगारी पर्व वाढत आहे. तर दुसरीकडे मद्य विक्री परवाण्याची संख्या वाढवून जनजीवन विस्कळीत केले जात आहे. जिल्हाधिकारी पदावर अविनाश पाठक हे रुजू झाल्यानंतर त्यांनी

## पान १ वरून

आम्हाला शब्द दिला होता की, जिल्ह्यात एकही बिअर बार मंजूर करणार नाही. पण हा शब्द फेल ठरला. आणि त्यांनी वीस बिअरबार मंजूर केले. एक बिअरबारला पाच लाखापेक्षा जास्त खर्च येत असल्याचे काहींनी आम्हाला सांगितले. त्यामुळे बियरबारला मंजुरी देताना कोट्यावधींचा घोटाळा झाल्याची आणि भ्रष्ट कारभार झाल्याचे समोर येत आहे. प्रशासनापेक्षा बाहेरच्या लोकांनी मलिदा मारल्याची चर्चा आहे.जिल्ह्यातील लोकांनी लाजा सोडल्याने समाजाचे वाटोळ होत आहे. दारू दुकान मंजूर करणे, हा नियम असला, तरी सामाजिक हित, आणि नैतिकता पाहिली पाहिजे. कामधंदा नाही, बेकारी वाढली आहे. गुन्हेगारी वाढली आहे. अशात दारुडे वाढविणे म्हणजे समाज व्यवस्था विस्कळीत करणे आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आता तरी नवीन लायसन देऊ नयेत, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे. तर दारू दुकाने वाढवण्याच्या मुद्द्याला आता आपण हात घालणार असून उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांच्यासह या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे समाज बिघडू नका, सामाजिक स्वास्थ्य जागेवर राहू द्या, दारुड्यांच्या कुटुंबाचे वाटोळ करण्यात सहभाग नोंदवू नका, राज्याचा महसूल खूप मोठा आहे. त्यातील भ्रष्टाचार कमी करा. त्याच बरोबर राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या माध्यमातून नवीन दारू दुकाने देऊन महसूल गोळा करण्याच्या भानगडीत पडून पाप करू नका, अशीही मागणी करणार असल्याचे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### आ.संदीप क्षीरसागर...

उड्डाणपूल तसेच इमामपूर रोड, नाथापूर रोड, परळी रोड या ठिकाणांवर स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या कामांची निविदा २ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून २२ जानेवारीपर्यंत २०२५ निविदा मागविल्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून औरंगाबाद-येडशी महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम २०१५ साली सुरू करण्यात आले होते. याच कामांतर्गत महामार्गावर बीड शहराच्या पूर्व बाजूने १२ कि.मी. अंतराचा बायपास म्हणजेच बाह्यवळण रस्ता तयार करण्यात आला. परंतु हा बायपास तयार करताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने इंडियन रोड काँग्रेसच्या () गाईड लाइन्स प्रमाणे काम केले नाही. इंडियन रोड काँग्रेसच्या () च्या गाईड लाइन्स नुसार बायपासला क्रॉस होणार्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग याठिकाणी स्लीप सर्विस रोड करणे आवश्यक आहे. परंतु बीड बायपासवर बीड-परळी रोड हा राष्ट्रीय महामार्ग, बीड-माजलगाव हा राज्य महामार्ग व बीड-इमामपूर हा प्रमुख जिल्हा मार्ग असे तीन महत्वाचे रस्ते क्रॉस होतात. तसेच बीड शहरात महामार्गावरून प्रवेश करताना असलेले छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल करण्यात आलेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याठिकाणी आवश्यक असलेल्या बाबींचे पालन न केल्यामुळे आत्तापर्यंत दोन्ही चौकांमध्ये एकूण १३ लोकांचा बळी गेल्याची नोंद आहे. अनेक लोकांना कायमचे अपंगत्व आले आहे. तर दरदिवस अपघात होऊन असंख्य लोक जखमी होत आहेत. सदरील बाबी नागरिकांच्या, प्रवाशांच्या आणि वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे याबाबत

## पान १ वरून

आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय सडक परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना ४ डिसेंबर २०१९ रोजी, बीड बायपासवर शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दोन्ही ठिकाणी म्हणजेच महालक्ष्मी चौक व छत्रपती संभाजी महाराज चौक येथे उड्डाणपूल तसेच बीड-परळी रोड, बीड-माजलगाव रोड व बीड-इमामपूर या तीन ठिकाणी स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याबाबत पत्रव्यवहार केला. यावर मा.नितीन गडकरी यांनी १४ जुलै २०२० रोजी पत्राद्वारे सदरील कामे करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला सुचविले होते. त्यानंतर आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील कामांच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली. तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनीही बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि तीन ठिकाणी स्लीप सर्विस रोड मंजूरीसाठी पत्रव्यवहार करत पाठपुरावा केला. परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून याबाबत दखल घेतली जात नसल्याने शेवटी माजी आ.सय्यद सलीम यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पिटीशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली. या प्रकरणात औरंगाबाद खंडपीठात दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायमूर्ती रविंद्र व्ही. घुगे व न्यायमूर्ती वाय.जी.खोब्रागडे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांचे म्हणने राष्ट्रीय महामार्गाचे मुख्य कार्यालय, द्वारका, नवी दिल्ली येथे पाठविले असून या कामासाठी तांत्रिक समिती देखील स्थापन केली आहे. तसेच मार्च २०२५ पर्यंत बीड बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक याठिकाणी उड्डाणपूल व इमामपूर रोडच्या स्लीप सर्विस रोडला मंजुरी देऊ असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून न्यायालयात सांगण्यात आले. परंतु न्यायालयाने या ठिकाणी होत असलेले अपघात आणि सुरक्षेच्या प्रश्नाची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ पर्यंत तीनही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे बीड बायपासवरील अपघात आणि सुरक्षेचा प्रलंबित असलेला मोठा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. दरम्यान या प्रकरणात याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांच्या वतीने ॲड.सय्यद तौसिफ यासीन यांनी काम पाहिले.

### आरोपींच्या अटकेसाठी...

केशरबाई पवार यांचा कुटुंबाला मारहाण करीत घर पाडले होते. यानंतर सकाळी केशरबाई पवार (वय ५० वर्ष) यांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. याबाबत मयताच्या मुलांनी हा घातपात असल्याचा आरोप करीत दोषींवर गुन्हा दाखल झाल्या शिवाय पोस्मार्टम न करण्याचा पावित्रा घेतला होता. व पेठ बीड पोलिसांवर गंभीर आरोप करीत ठाण्यासमोर ठिय्या मांडला होता. यानंतर आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु अद्याप यातील आरोपी अटक नसल्याने मयत केशरबाई पवार यांच्या नातेवाईकांनी आक्रमक पावित्रा घेत आरोपींच्या अटकेची मागणी करीत शहरातील बिंदुसरी नदीपात्रात बार्शी रोडवरील मोठ्या पुलाजवळील एका डोहात उतरुन जलसमाधी आंदोलन सुरू केले. यावेळी पोलीस प्रशासन हाय.. हाय.., आरोपींना अटक झालीच पाहिजे, आमच्या आईला न्याय मिळालाच पाहिजे अशी घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनाची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पेठ

## पान १ वरून

बीडचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांनी घटनास्थळी भेट दिली यावेळी पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी येत्या १३ तारखेपर्यंत आरोपीं अटक करण्याचे आंदोलकांना आश्वासन दिले. यानंतर आंदोलक पाण्यातू बाहेर आले. तर १३ तारखेपर्यंत आरोपी अटक नाही झाले तर त्यानंत जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करणार असल्याचा इशारा दिल आहे. या आंदोलनामुळे थंडीच्या वातावरणातही वातावरण तापल्याचे दिसू आले.

### चमकोगिरी थांबवा...

यांनी दिला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरु मंत्री धनंजय मुंडेंचा राजीनामा मागीतला जात आहे. विरोधीपक्षासोबत महायुतीचे लोकप्रतिनिधी देखील राजीनामा मागत आहेत. या पार्श्वभूमीव आता धनंजय मुंडे यांच्याबाजुने देखील लोक समोर येत आहेत. य प्रकरणावरुन राजकारण सुरु असल्याचे सांगत बहुजन विकास मोर्चा बाबुराव पोटभरे यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली. य घटनेचे राजकारण केले जाऊ नये. काही तथाकथित लोकप्रतिनिधी प्रकरणाला वेगळे वळण देत आहेत. तिन चार ठेकेदारांनी या प्रकरणाती आरोपींना वाजविण्याची सुपारी घेतली आहे. प्रकरण दुसरीकडे वळवू मुळ आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न होत आहे. सीआयडी, एसआयट तपास करत आहेत मात्र फक्त चमकोगिरीसाठी, स्वतः च्या स्वार्थासाट प्रकाश सोळंकेंपासून संदीप क्षीरसागरांपर्यंत धनंजय मुंडेंवर आरोप करु स्वार्थ साधत आहेत. हेच न्यायालय बनत आहेत. या सर्वांनी चमकोगि थांबवावी नाही तर आम्ही रस्त्यावर उतरू असे पोटभरे म्हणाले. धनंज मुंडेंवर आरोप करणारांची पार्श्वभूमी काय ? हेच टक्केवारीखोर, गुन्हेगा आहेत. प्रकाश सोळंकेंवर गुन्हा दाखल आहेच. आम्ही बोलणं सुरु केल तर सोळंकेंना तोंड उघडता येणार नाही. संदीप क्षीरसागरांचा तर दहशतीच काळाकुट्ट इतीहास आहे. आम्हाला गुण्यागोविंदाने जगु द्या. सुरेश ध माझे मित्र आहेत. त्यांनी सबुरीने घ्याव. त्यांच्याही खाली खुप मोठा अंधार तो बाहेर काढण्याची, इतीहास सांगण्याची वेळ आणू नका. तुमचे मुंडेंसोबत राजकीय भांडण त्यासाठी देशमुख हत्या प्रकरणाचा वापर करु नका असेह पोटभरे म्हणाले.

### खतांच्या किंमती वाढल्या...

घटकांची परदेशातून मागणी करावी लागते. परंतु जगातीक बाजारामध् कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळे खतांच्या किमती वाढल्या आहेत याचा फटका आता शेतकरी वर्गाला बसला असून सरकारने खतांवरी अनुदान वाढवावे अशी मागणी होत आहे. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठ शेतकऱ्यांना शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर करावा अशी मागण केली जाते. तर दुसरीकडे वर्षाला खतांच्या किमतीमध्ये वाढ होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होत आहे. शेणखताचा शेता वापर केल्यामुळे जमिनीतील सेंद्रिय घटकांचे प्रमाण वाढते. त्यामुळे शेणख खरेदीला शेतकऱ्यांची जास्त मागणी आहे. त्यामुळे किमतीमध्ये मोठ्य प्रमाणात वाढ झाली आहे. ✻ खतांचा दर किती? : डीएपी - १३५ रुपये, १०:३२:१६ - १७०० रुपये, १०:२६:२६ - १७०० रुपये.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यातील खेळाडू नावारुपाला येत आहेत: व्यंकटेश वैष्णव

## क्रीडा महोत्सवात मुलांच्या कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात खरी गुणवत्ता आहे, ती योग्य वेळी ओळखून रणवीर पंडित यांनी क्रिडा महोत्सवात स्वत:ला झोकून दिले. आपल्या तालुक्यातील विद्यार्थी खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी केले आहे, त्यातुनच अनेक खेळाडू नावारुपाला येत आहेत. खेळात सातत्य आणि मैदानावर खेळाडू टिकून राहिले तर आपले राज्य आणि देशाला उत्तम खेळाडू गेवराईतून मिळतील असा विश्वास पत्रकार व्यंकटेश वैष्णव यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थाअंतर्गत क्रीडा महोत्सवात मुलांच्या कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शारदा स्पोर्टस कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत क्रीडा महोत्सवातील दुसऱ्या दिवशी मुलांच्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन गेवराई येथील शारदा विद्या मंदिराच्या भव्य मैदानावर सोमवार दिनांक ०६ जानेवारी रोजी करण्यात आले. या वेळी दै. पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी व्यंकटेश वैष्णव, दै. दिव्य मराठीचे प्रतिनिधी अमोल मुळे, सरपंच विष्णुपंत घोंगडे, संदीप मडके, अक्षय पवार, शेख मोहसीन यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. स्काउट- गाईड पथक, भारतीयम पथक, सांस्कृतिक पथकाच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून मानवंदना दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मैदान पूजन आणि खेळाडूचा परीचय करून सामान्यांना प्रारंभ झाला. शुभारंभाचा सामना १४ व १७ वर्ष वयोगटातील माध्यमिक विद्यालय उमापुर विरुद्ध माध्यमिक विद्यालय खळेगाव आणि दुसरा सामना माध्यमिक विद्यालय भेंडटाकळी विरुद्ध माध्यमिक विद्यालय राम पुरी तसेच माध्यमिक विद्यालय उमापुर विरुद्ध शिवशारदा पब्लिक स्कूल,गढी आणि माध्यमिक विद्यालय भेंडटाकळी विरुद्ध माध्यमिक विद्यालय मालेगाव यांच्या दरम्यान झाला.

शिवाजीराव पंडित परिवाराने क्रिडा क्षेत्राला राजाश्रय दिला: अमोल मुळे

यावेळी बोलताना पत्रकार अमोल मुळे म्हणाले शिवाजीराव दादा पंडित परिवारातील प्रत्येक सदस्याने क्रिडा क्षेत्राला न्याय आणि राजाश्रय दिला आहे. रणवीर पंडित यांच्या रुपाने पंडित परिवाराची तिसरी पिढी क्रिडा क्षेत्रात उतरली आहे. रणवीर पंडित ग्रामीण भागातील खेळाडूंना घडविण्यासाठी मेहनत घेत आहेत. खेळ हा जात आणि धर्म सोडून सर्वांना एकत्र आणत असतो. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचा हा क्रिडा महोत्सव इतरांनी आदर्श घेण्यासारखा उपक्रम आहे. हा क्रिडा महोत्सव संपूर्ण राज्यात आदर्श क्रीडा महोत्सव म्हणून ओळखला जाईल. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कबड्डी खेळासारखाच दम टिकवून ठेवता आला पाहिजे. विद्यार्थ्यांनी जिंकण्याची जिद्द उरात ठेवण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## बीड येथे अन्न दिन साजरा : तहसीलदार शेळके यांची स्वस्त धान्य दुकानास भेट




**बीड । प्रतिनिधी**

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अन्न दिनानिमित्त स्वस्त धान्य दुकान क्रमांक ३२ ला भेट देऊन लाभार्थ्यांना समक्ष धान्य वाटप करून घेतले आणि ई केवायसी बद्दल मार्गदर्शन केले . आज मंगळवार ७ जानेवारी रोजी अन्नदिनाच्या निमित्ताने बीड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानात शिधापत्रिका धारक यांना धान्य वितरण करुन अन्न दिन साजरा करण्यात आला .

## शिवजन्मोत्सवा निमित्त यंदा माजलगावात अवतरणार भगवान तिरुपती बालाजी!

### भागवत कथेसह विविध धार्मिक कार्यक्रमाची राहणार रेलचेल; गरजवंतानी विवाह सोहळ्यासाठी नाव नोंदणी करावी-अध्यक्ष बाळू ताकट



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरात प्रति वर्षाप्रमाणे शिवजन्मोत्सवानिमित्त सर्व धर्मीय विवाह सोहळ्यासह यंदा माजलगावकरांना साठी श्री श्रीनिवास कल्याणम महोत्सव व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्ताने भगवान तिरुपती बालाजी याठिकाणी अवतरल्याचा साक्षात्कार होणार आहे.दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल यावेळी दिसणार असून गरजवंतांनी विवाह सोहळ्यासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन अध्यक्ष बाळू ताकट यांनी केले आहे. शिव सेवाभावी संस्थेकडून माजलगाव शहरात गेल्या अनेक वर्षापासून शिवजन्मोत्सवानिमित्त सार्वजनिक विवाहसोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यानिमित्ताने गोरगरीब पात्र मुला मुलींचे विवाह लावले जातात. प्रत्येक वेळी आगळ्यावेगळ्या धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल या निमित्ताने माजलगावकरांना अनुभवास येते.यंदाच्या वर्षी महाराष्ट्रात पहिल्यांदाच माजलगावकरांना श्रीदेवी व भू देवीचे भगवान स्वामी व्यंकटेश्वरा सोबत दिव्य लग्न सोहळ्याची अनुभूती पाहायला मिळणार आहे. त्याचप्रमाणे उज्जैन येथील अनन्य देवी शर्मा यांच्या मधुर वाणीतून श्रीमद भागवत कथा ऐकायला मिळणार आहे.तर विविध धार्मिक देखावे यानिमित्ताने पाहायला मिळणार आहेत.तिरुपती बालाजीच्या पालखीसह भव्य शोभायात्राही पार पडणार आहे. त्यामुळे मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या शिवजन्मोत्सवा निमित्तच्या विवाह सोहळ्यात पात्र वधू-वरांची नाव नोंदणी करावी, असे आवाहन शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळू ताकट यांच्यासह जगदीश साखरे,प्रशांत होके,राहुल मुगदिया,बल्ली(विष्णु) होके,प्रसाद सावंत,सचिन सुरवसे, ऋषिकेश शेंडगे,सुरज पवार,राहुल सरोदे, प्रसाद काळे, स्वप्निल भानप, सुमित कुलकर्णी, अमर राजमाने यांनी केले आहे.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये सामूहिक वाचन उपक्रम संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयातील ग्रंथालय व माहिती केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा दिनांक १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान विविध उपक्रमांनी साजरा होत आहे. विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याला चालना मिळण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी विविध विषयांवरील ज्ञानाची भूक भागावी वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांसाठी आयोजित सामूहिक वाचन उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे तसेच धारूर सर्व परिसरातील पत्रकार बंधूंनी भेट दिली. यामध्ये प्रकाश काळे, अनिल महाजन, अतुल शिनगारे, संदिपान तोंडे, राम शेळके, धनंजय कुलकर्णी, सय्यद शाकेर अली, अतिक मोमीन, सूर्यकांत जगताप, सचिन थोरात, रवी गायसमुद्रे सुभाष साखरे, दिनेश कापसे, सुनील तोंडे यांनी भेट दिली. याप्रसंगी महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दर्पण दिनानिमित्ताने पत्रकार बंधूंचा सत्कार समारंभ संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दर्पण दिनानिमित्ताने धारूर शहर व परिसरातील पत्रकार बंधूंचा सत्कार समारंभ प्रसंगी दैनिक लोकमतचे वार्ताहर अनिल महाजन यांनी मनोगत व्यक्त करताना, मराठी वर्तमानपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या वर्तमान पत्रांच्या माध्यमातून समाजाला जागृत करणे या उद्देशाने सुरू झालेल्या वर्तमानपत्रांचे कार्य आजही अविरतपणे सुरू आहे. समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण मिळाले पाहिजे तसेच समाजातील घडणाऱ्या विविध गोष्टीं सबंधीचे ज्ञान मिळाले पाहिजे. देशावरील अन्याय कारक राजवटीतून भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जागृत करण्याचे कार्य दर्पणद्वारे घडले असे प्रतिपादन या निमित्ताने अनिल महाजन यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी दर्पण दिनानिमित्त आयोजित सत्कार समारंभासाठी उपस्थित सर्व पत्रकार बंधूंचे स्वागत व अभिनंदन केले. पत्रकार समाजाचा आरसा जनतेसमोर ठेवत असतात. समाजातील विविध प्रकारच्या बातम्या जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करतात. त्यामुळे समाजातील घटकाला विविध गोष्टींची माहिती मिळते. एकूणच समाजाला जागृत करण्याचे कार्य पत्रकारांच्या मार्फत घडते असे सांगितले. या स्वागत व सत्कार समारंभासाठी धारूर शहर व परिसरातील ज्येष्ठ पत्रकार प्रकाश काळे, अनिल महाजन, अतुल शिनगारे, संदिपान तोंडे, सय्यद शाखेर अली, सूर्यकांत जगताप, अतिक मोमीन, सचिन थोरात, राम शेळके, सुभाष साखरे, रवी गायसमुद्रे, दिनेश कापसे, धनंजय कुलकर्णी, सुनील तोंडे या पत्रकार बंधूंची सत्कार सोहळ्यास उपस्थिती होती.

## आमचा गाव आमचा विकास मोहीमेंतर्गत लिंबागणेश ग्रा.प. कार्यालयात शाश्वत विकास ध्येयांच्या ९ संकल्पना अनुषंगाने विशेष सभा



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.७ मंगळवार रोजी वानखेडे पी.एन. गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या आदेशाने सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आमचा गाव आमचा विकास (ऋझऊझ) सबकी योजना सबका विकास मोहीमेंतर्गत ग्रामविकास अधिकारी एस.एस.वीर यांनी या मोहिमे अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या शाश्वत विकास ध्येयांच्या (डऊॠ ) नऊ संकल्पना १)गरीबी मुक्त आणि उपजिविका(रोजगार )२) आरोग्यदायी गाव ३)बालस्नेही गाव ४)जलसमृद्ध गाव ५) स्वच्छ आणि हरित गाव ६) स्वयंपुर्ण पायाभूत सुविधायुक्त गाव ७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव,८) सुशासन युक्त गाव ९) लिंग समभाव पोषक गाव याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, उपसरपंच बालासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड,अक्षय वाणी, शेख समीर, लक्ष्मण वाणी,सुरेश निर्मळ , दादा गायकवाड, बाळकृष्ण मुळे, तुकाराम गायकवाड, औदुंबर नाईकवाडे, संजय सुकाळे, बबन निर्मळ, कृष्णा गिरे, सोनाजी कुदळे, रंजित साळुंके, संतोष शिंदे आदी उपस्थित होते.

## संत- महंत हे जगाच्या कल्याणासाठी तर पत्रकार वंचितांच्या न्याय हक्कांसाठी काम करतात : ह भ प गणपत महाराज उबाळे

### व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने सामाजिक उपक्रमांनी दर्पण दिन साजरा : मतिमंद विद्यालयात दिव्यांगांना शैक्षणिक साहित्यांसह खाऊचे वाटप



**तलवाडा । प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन पत्रकारांकडे पाहिले जाते. पत्रकार हा समाजात जनजागृतीचे काम करत असतो. समाजात पत्रकारांची भूमिका महत्वाची असून संत-महंत हे जगाच्या कल्याणासाठी काम करतात तसे पत्रकार बांधवही जनसेवेचा वसा घेवून समाजातील दीनदुबळ्यांना तसेच वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करतात असे प्रतिपादन ह.भ.प. गणपत महाराज उबाळे यांनी व्यक्त केले.

गेवराई येथे व्हॉईस ऑफ मीडिया व दक्ष पत्रकार संघ गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.६ जानेवारी २०२५ रोजी मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृति दिनानिमित्त सामाजिक दायित्व म्हणून शहरातील कै.भगवानराव ढोबळे मुकबधीर व मतिमंद निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांसह खाऊचे वाटप करुन त्यांच्यासमवेत दर्पण दिन साजरा करण्यात आला. यावेळी ह.भ.प.गणपत महाराज उबाळे बोलत होते. तत्पूर्वी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करुन अभिवादनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे, नागझरीचे सरपंच ड.नारायण शिंदे, शेतकरी नेते राजेंद्र डाके, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब घोडके, शाळेचे मुख्याध्यापक माणिकराव रणबावळे, व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद नरसाळे, रेणुकामाता संस्थेचे सहसचिव शिवाजी ढोबळे सह आदी उपस्थित होते. यावेळी माजी नगराध्यक्ष दादासाहेब गिरी, मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी सय्यद मुदस्सीर, अशोक बेडके, रवींद्र अरबाड, प्रल्हाद बोंदरे, अंकुश लाटे, प्रशांत सरोदे, संतोष पुंड, भागिरथी उगले , यांच्यासह मतिमंद व मुकबधीर निवासी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विविध संघटनेचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळीनी दर्पण दिनानिमित्त उपस्थित राहून पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष भागवत जाधव, तालुकाध्यक्ष विनोद पौळ, उपाध्यक्ष विष्णुपंत गायकवाड.

## विभागीय लोकशाही दिनाचे १३ जानेवारी रोजी आयोजन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी १३ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तसेच नियमित विभागीय लोकशाही दिन संपल्यानंतर विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. विहित नमुना अर्ज प्रप्रत्र-१ (क) आवक शाखेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. विभागीय महिला लोकशाही दिनासाठी पिडीत महिलांनी विहीत नमुन्यातील मुदत पुर्व अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, तथा सदस्य सचिव यांच्याकडे सादर करता येणार आहे.

अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही




दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानात नियमावलीचे पालन करावे: जिल्हाधिकारी अविनाश पाठक




**बीड । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या जीवाचे संरक्षण, रस्ता सरळ आणि वाहने चालविणे बेताचे असेल तर आपण आपल्या जीविताचे संरक्षण करु शकतो. यासाठी रस्यासंतील दुभाजक, स्पीडब्रेकर, वळण रस्ता, चौक अशा ठिकाणी वाहन चालवण्याचे नियम वापरणे गरजेचे आहे. प्रत्येक ठिकाणी कायदा आपले संरक्षण करु शकत नाही तर आपणच घालून दिलेल्या नियमावलीचे पालन करावे, असे प्रतिपादन रस्ता सुरक्षा अभियानाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केली होती त्यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले.

या बैठकीस खासदार बजरंग सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती तसेच बालाजी धनवे, व्हि. डी. सपकाळे, गणेश जायभाये, शेखर अचार्य विविध विभागाचे संबधित अधिकारी उपस्थित होते.

मृत्युदर व अपघाताचे प्रमाण कसे कमी करता येईल यावर पुढील मुद्यांवर आढावा घेतला. रस्ते सुरक्षाबाबत काय उपायोजना केल्या,रत्याची प्रलंबित कामांचे प्रस्ताव नव्याने सादर करावेत, जिल्हा नियोजन समितीमधून निधी मंजूर करता आला तर तशी मागणी करता येईल. जिल्हयातील ब्लँक स्पॉटची स्पाटची तपासणी, जिल्हास्तरावर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रस्ता सुरक्षा उपाययोजना, जिल्हयातील अपघातांची संख्या कमी करणे, जिल्हयामध्मये होणा-या अपघाताची नोंद, दुभाजके तोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान करणा-या व्यवसायिक आस्थापनावर कारवाई, ट्रामा केअर सेंटर आणि रस्त्या लगत असणारे प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हयामध्ये होणारी अपघाताची नोंद इरादा या पबेस व वेबबेस प्रणालीवर नोंदविणे, दोषी वाहन धारकावर कारवाई करणे इत्यादी मुद्याचा आढावा या प्रसंगी श्री पाठक यांनी घेतला. प्रस्ताविक व आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता व सदस्य सचिव आर.पी तोडें यांनी केले.

# गुगळा देवी नैसर्गिक शेतकरी गटांनी बनवल्या सेंद्रिय निविष्ठा

**गेवराई । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील डॉ,प्रा, कुलगुरू श्री इंद्र मनी सर यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक साहेब जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री साळवे साहेब विद्यापीठाचे इतर शास्त्रज्ञ परभणी कृषी विद्यापीठाच्या गायकवाड मॅडम तसेच खामगाव की वि के च्या संचालिका डॉक्टर दीप्ती पाडगावकर मॅडम तसेच नवनिर्वाचित संचालक ज्ञींज्ञ डॉक्टर हनुमान गरुड सर यांच्या माध्यमातून आज आम्ही दोन्ही फोटोच्या माध्यमातून जीवामृत दशपर्णी अर्क निमास्त्र अग्निअस्त्र जीवामृत, निवीष्ठ खालील प्रमाणे

२०० लिटरचा बॅलन्स १८० लिटर पाणी २० गोमूत्र लिटर एक किलो गूळ एक किलो बेसन पीठ एक मूठभर वडाखाली माती या सर्वांचा मिश्रण करून हे मिश्रण ७२ किंवा ४८ तासाकरता अंबोली




ठेवावी आणि नंतर एक एकर साठी वापरावे तसेच

दुसरे निवीष्ठा,खालील प्रमाणे अग्निअस्त्र वीस लिटर गोमूत्र दोन किलो कडुलिंबाचा पाला अर्धा किलो गावरान तंबाखू अर्धा किलो हिरव्या मिरचीचा ठेचा अर्धा किलो पावशेर लसणाची चटणी या द्रावणाला चार उकळी येऊन द्यायच्या नंतर बहात्तर तासासाठी थंड होण्यासाठी ठेवायचं सहा महिन्यापर्यंत वापरता येतो यानंतर आपण निमास्त्र बनवलं नि मास्तर बनवण्याची प्रक्रिया १८० लिटर पाणी वीस लिटर गोमूत्र दोन किलो शेण व दहा किलो लिंबाचा पाला किंवा लिंबोळी पावडर लिंबोळी पावडर ही मिक्सरमधून बारीक घ्यायची नाही ती उकळामध्ये किंवा खलबत्त्यामध्ये उठायची यानंतर हे सहा महिन्यापर्यंत वापरता येते मग हा ट्रिप्स पांढरी माशी यासाठी उपयोग होतो यानंतरची दुसरी निविष्ठा दशपर्णी अर्क दशपर्णी अर्क म्हणजे दहा झाड पाण्याचा पाला ज्यांना जनावर खात नाहीत अशा लिंबाचा पाला पाच किलो सिताफळीचा पाला तीन किलो बेसर्मीचा पाला दोन किलो धोत्र्याचा पाला दोन किलो रूट पाला दोन किलो गुळवेल चा पाला दोन किलो घाणेरीचा पाला दोन किलो लाल कनेर दोन किलो एरंड चा पाला दोन किलो टणटणच्या पाला दोन किलो मोगलेचा पाला दोन किलो हे सर्व बारीक करून १७० लिटरच्या पाण्यामध्ये टाकून द्यायचे त्यामध्ये पाचकिलो शेण दहा लिटर गोमूत्र पावशेर नसून हे पूर्ण द्रावण एकत्र करून या द्रावणाला ४० दिवस आबवण्यासाठी ठेवायचं.

# आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद : रूपालीताई चाकणकर

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांच्या हस्ते आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे मागिल १२ वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले यामध्ये जेष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे,मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पशुसंवर्धन, पर्यावरण,वातावरण बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे, ना.धनंजयजी मुंडे, ओबीसी विकास, दुग्धविकास,ऊर्जा नुतनीकरण मंत्री अतुलजी सावे,मा.मंत्री आ.सुरेश धस, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मा.मंत्री सदाभाऊ खोत,मा.मंत्री शिवाजीराव कर्डिले,मा.आ.बाळासाहेब आजबे,आ. अरुण काका जगताप,मा.आ.भिमराव धोंडे, पनवेलचे आर आर फाऊंडेशनचे अध्यक्ष स्व.राहुल पाटील आदी अधिकारी पदाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले आहे.**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद आहे गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत या संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे इतर पत्रकार संघानी दखल घेऊन समाजासाठी काम करावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ.रुपालीताई चाकणकर यांनी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे पुणे येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात सोमवारी दुपारी प्रकाशन प्रसंगी केले. आष्टी तालुका युवा पत्रकार संघ गेल्या १२ वर्षांपासून दिनदर्शिका प्रकाशित करून सर्वसामान्यांना मोफत वितरण करण्यात येत असते सन २०२५ च्या दिनदर्शिकेचे पुणे येथील महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रुपालीताई चाकणकर यांच्या पुणे येथील संपर्क कार्यालयात दि.६ जानेवारी रोजी त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले पत्रकार संघाच्या कार्याचे सौ. रुपालीताई चाकणकर यांनी कौतुक केले यावेळी अध्यक्ष अविनाश कदम, संतोष शेठ सानप,पत्रकार अतुल जवणे,प्रेम पवळ,अक्षय विधाते, सचिन तावडे आदी मान्यवर उपस्थित होते.




# क्रांती खेडकर शिक्षण विस्तार अधिकारी यांना सावित्रीची लेक या पुरस्काराने सन्मानित

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रा राज्य प्राथमिक शिक्षण समिती यवतमाळ यांच्यावतीने प्रशासकीय कार्यामध्ये अल्पावधीतच उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी म्हणून सावित्रीची लेक या पुरस्काराने दि. ३ जानेवारी रोजी यवतमाळ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मंदार पत्की व आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते वडवणी ची लेक क्रांती महादेव खेडकर यांना सावित्रीची लेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजयजी कोंबे राज्य अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, प्रमुख पाहुणे प्रकाश जी मिश्रा शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ, श्रीमंती निधाताई गावंडे उपशिक्षणाधिकारी यवतमाळ, श्रीमंती सपना ताई पावडे, प्रसिद्ध कवयित्री, सारिका फुसे पोलीस उपनिरीक्षक, डॉ.स्नेहा भुयार यांच्या प्रमुख उपस्थिती होती. शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम करुन आपण जीवन समर्पित करणाऱ्या वडवणी ची लेक क्रांती महादेव खेडकर यांनी यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून चांगले कार्य केले म्हणून सावित्रीची लेक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# देगलूर ते शिर्डी साईबाबा पालखीचे गुरूवारी तलवाडयात आगमन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील पावन दत्त मंदिर संस्थान याठिकाणी देगलूर ते शिर्डी श्री साईबाबा पालखी पायी दिंडी सोहळ्याचे गुरूवारी सकाळी ठिक ११ वाजता आगमन होणार असून साईबाबा पालखीचे स्वागत व दर्शनासाठी भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पावन दत्त मंदिर संस्थानचे सचिव - अरूण हाटकर सर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे. या पायी दिंडी सोहळ्यात जवळपास ४०० साईभक्त सहभागी असून या दिंडी सोहळ्याचे नेतृत्व सुभाष वडगावे हे गेल्या अनेक वर्षापासून करत आहेत. या पायी दिंडी सोहळ्यातील श्री साईबाबा



भक्तांसाठी गुरूवार दि.०९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी भोजनाची व्यवस्था पावन दत्त मंदिर संस्थान, छत्रपती शिवाजी महाराज चौक तलवाडा याठिकाणी त्वरिता तरूण मंडळ तथा पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने करण्यात आली आहे. तरी पावन दत्त मंदिर संस्थान समितीचे पदाधिकारी व सदस्य असलेले डॉ. आसाराम मराठे, बापू गाडेकर, पत्रकार आर आर आबा प्रा.शाम कुंड, शरद खुरूद, ईश्वर पवार, विजय गर्जे, सुनिल गवांडे, गोपाल शेटे, हरिभाऊ अंकुशे, दत्तात्रय निकम, देविदास राऊत, प्रल्हाद गोरे, संतोष सुरासे, राजेंद्र शिंदे, रविंद्र मदुरे, राजेंद्र मुदळ, विठ्ठल सुरासे, राजेंद्र बिडे, अनंत कलाल, आकाश राऊत, बंडू विटकर, दिपक रायते, कैलास सुरासे, अमोल बिडे, संतोष शिंगणे, गोरख काळे, अनिल शिंदे आदींनी गुरूवारी दिवसभर पावन दत्त मंदिर संस्थान, छत्रपती शिवाजी महाराज चौक तलवाडा.

# भाजपाचे सदस्य नोदणी अभियान

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे , माजी खा. डॉ प्रीतम ताई मुंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनात व भाजपा जिल्हा संपर्क व नोंदणी अभियान जिल्हा संयोजक नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या नियोजनातून दि ५ जानेवारी रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा समोरील बाजारतळ पूर्ण पेठ बीड तसेच दि. ०६ जानेवरी सोमेश्वर महादेव मंदिर बीड येथे , सोमेश्वर नगर, शिवाजीनगर ,स्वराज नगर, जिजाऊ नगर ,शिराळे नगर, तिरुपती नगर , धांडे नगर, सावता नगर, लक्ष्मण नगर, माळी गल्ली, शिराळे गल्ली ,गणपती नगर, शचंपावती नगर, गणेश नगर,या




संपूर्ण नागरिकांची येथे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले.

यावेळी सदस्य नोंदणी बीड जिल्हा संयोजक नवनाथ आण्णा शिराळे, सरचिटणीस देविदास नागरगोजे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अजय सवाई, वैद्यकीय आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर अभय वनवे, मीराताई गांधले, गणेश पुजारी, शांतिनाथ डोरले, फारुक शेख, संदीप उबाळे, लताताई राऊत, भूषण पवार , देवाभाऊ नलावडे, राजू शहाणे, संतोष गवळी, नरेश पवार, विष्णुदास सुरवसे, बाबुराव परळकर, राजेश चरखा, संतोष थोरात, चंद्रकांत मुळे, ड.गोविंद शिराळे,आदी पदाधिकारी उपस्थित होते. या अभियानास बीड शहरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

# निर्भीड पत्रकार संघ माजलगावच्या वतीने दर्पण दिन साजरा

## पत्रकारांना बदनाम करण्याचे काम काही प्रवृत्ती करतात: ज्येष्ठ पत्रकार उमेशकाका मोगरेकर

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव- प्रतिनिधी येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे मराठी भाषेतील पहिले वृत्त साप्ताहिक दर्पण हे सर्वप्रथम काढले व या दर्पण साप्ताहिकाच्या माध्यमातून समाजातील तत्कालीन समस्या आणि अडचणी विषयाचे काम कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी केल तसेच तत्कालीन इंग्रज सरकार विरुद्ध आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण करण्याचे काम केले व दर्पण म्हणजे आरसा समाजातील घटनांचा घडामोडीचा आरसा समाजासमोर मांडण्याचे काम केले तो दिवस म्हणजे सहा जानेवारी म्हणून दरवर्षी दरपण दिन साजरा केला जातो त्याचीच




औचित्य साधून माजलगाव च्या निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ पत्रकार दैनिक झुंजार नेता चे तालुका प्रतिनिधी व नुकताच बीड जिल्हा दर्पण पुरस्कार प्राप्त झालेले सर्वांचे मार्गदर्शक उमेश काका मोगरेकर यांचा सर्व पत्रकारांच्या वतीने सत्कार करण्यात आला, प्रसंगी सत्काराला उत्तर देताना ज्येष्ठ पत्रकार उमेश काका मोगरेकर म्हणाले की, समाजातील काही प्रवृत्ती पत्रकार क्षेत्राला बदनाम करण्याचे काम करीत आहेत त्या प्रवृत्तींना तोंड देत देत समाजाच्या अडीअडचणी मात करीत लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असल्याने आपले कर्तुत्व सिद्ध केले पाहिजे व लोकशाही बळकट करण्यासाठी समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार व समस्या मांडत समाजाचे हित जोपासत व पुढे जाण्याची काम केले पाहिजे निर्भीड पत्रकार संघाने याप्रसंगी सत्कार उत्तर देताना श्री मोगरेकर म्हणाले की, आम्ही इतरांना दर्पण पुरस्कार देतो तेव्हा बरेच लोक व मित्र म्हणत की तुम्ही स्वतः ला पुरस्कार का घेत नाहीत तर आपणच कार्यक्रम घ्यायचा व आपणच पुरस्कार घ्यायचा हे योग्य नाही असे मी त्यांना म्हणत असतो तेव्हा माझ्या कार्याची दखल बीड जिल्हा पत्रकार संघाने घेऊन मला पुरस्कार दिल्याबद्दल व निर्भीड पत्रकार संघाने माझा सत्कार केल्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा माजलगाव शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले दैनिक दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी तथा नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे,ज ेष्ठ पत्रकार विष्णू दादा उगले,ज्येष्ठ पत्रकार किशन भदर्गे, ज्येष्ठ पत्रकार अरविंद दादा ओव्हाळ, निर्भीड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आढागळे निर्भीड पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष अमर साळवे,राजरतन डोंगरे, संतोष रासवे,विजय डावरे, बालासाहेब उपाडे, निलेश गरुड,मच्छिंद्र उपाडे, धनंजय माने , वैभव झगडे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

